# प्रादेशिक परिवहन विभाग

## १. सीआर/२९/मुंबई/१४

फिर्यादी यांचा ट्रॅव्हल्सचा व्यवसाय असून ते बांद्रा, मुंबई परिसरातील विद्यार्थ्याची ने—आण करण्याचे काम करतात. सदरचा व्यवसाय करीत असताना वेगवेगळया कारणांमुळे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून बस चालकांना मेमो दिले जातात. सदर मेमो बद्दल दंड भरताना परिवहन खात्यातील अधिकारी फिर्यादी व इतरांकडून दंडाव्यतिरिक्त अधिक रक्कम लाच म्हणून मागत असतात. अंधेरी परिवहन कार्यालय येथील सहाय्यक प्रादेशिक अधिकारी आरोपी राजेद्र एकनाथ नेरकर हे वारंवार लाचेची मागणी करुन फिर्यादीस त्रास देत होते. आरोपी नेरकर सदर लाचेची रक्कम त्यांचे कार्यालयात त्यांचे सोबत काम करणारा खाजगी इसम जयप्रकाश मोरेश्वर दळवी यांचे मार्फत स्वीकारत होते. फिर्यादी यांच्या बस चालकास दिनांक ०६/०३/२०१४ रोजी भरारी पथकाचे वहातूक निरीक्षक श्री राहूल नलावडे यांनी गाडीची कागदपत्रे हजर केली नाहीत म्हणून मेमो दिला होता. त्या मेमोसंबधी फिर्यादी हे दिनांक १०/०४/२०१४ रोजी आरोपी लोकसेवक नेरकर यांना भेटले असता, फिर्यादी यांच्या व त्यांच्या मित्राच्या बसच्या मेमोकरीता रु. २०००/— लाचेची मागणी केली होती. म्हणून फिर्यादी यांनी दिनांक ११/०४/२०१४ रोजी ॲन्टी करप्शन कार्यालयात तक्रार दिली होती. दिनांक १९/०४/२०१४ रोजी आरोपी लोकसेवक नेरकर यांनी बसचा कायदेशीर दंड रु. २६००/— भरुन रु. २०००/— लाचेची मागणी केली. तडजोडीअंती आरोपी लोकसेवक नेरकर यांनी रु. १५००/— लाचेची मागणी करुन ती रक्कम त्यांच्या कार्यालयातील खाजगी इसम जयप्रकाश दळवी यांच्याकडे देण्यास सांगीतली. त्यानुसार खाजगी इसम जयप्रकाश दळवी यांस आरोपी लोकसेवक नेरकर यांच्या सांगण्यावरुन रु. १५००/— लाच रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई येथे गु.र.क्रमांक २९/२०१४, कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३ (२) ला.प्र.का. प्रमाणे गुन्हा नोंद करून नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली.